# ॥ श्री गणेश प्रतिष्ठापना पूजाविधिची पूर्व तयारी ॥

## ॥ पुजेची तयारी व मांडणी ॥

- भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशी श्री गणेश प्रतिष्ठापना करतात.
- आपल्या आवडीची १ मोठी शोभेची (मातीची, धातूची, प्लॅस्टर ऑफ पॅरीसची...) व १ मातीची लहान विसर्जन करावयाची अशा दोन गणेशमूर्ति कमीत कमी २ ते ३ दिवस आधीच आणून ठेवाव्यात. लहान मूर्ति एखाद्या वस्त्राने झाकून ठेवावी.
- पूजेच्या दिवशी लवकर उठून स्नान करून नित्य देवपूजा करावी व श्री गणेश प्रतिष्ठापना पूजेच्या तयारीस सुरूवात करावी. सर्व पूजा साहित्य गुरूजींनी दिलेल्या यादीनुसार पुन्हा एकदा तपासून बघावे.
- मुख्य दाराला तोरण बांधावे, दारासमोर रांगोळी काढावी. मंगल व पवित्र वातावरण तयार करण्यासाठी चांगले सतार, सनइ,संतूर, बासरी वगैरे मंगल वाद्य संगीत सुरू करावे.
- कॅमेरा व कॅमकॉर्डर तयार ठेवा व हा तुमच्या आयुष्यातला महत्वाचा आनंदाचा क्षण जपुन ठेवण्यास विसरू नका. तुमच्या नातेवाईकांना व मित्रमंडळींना दाखवून तुम्हाला तुमचा आनंद भविष्यकाळातही द्विगुणित करता येईल. तसेच पुढच्या पिढीसमोर एक चांगला आदर्श कायम स्वरूपात ठेवता येईल.
- प्रसादाचे मोदक (कमीत कमी २१), खिरापत व महाप्रसादाचे ताट वेळेत तयार करावे. पूजा सुरू झाल्यापासून सुमारे दोन तासांनी प्रसाद व महाप्रसाद तयार असायला हवा.
- यजमान दांपत्याने पूजेला बसण्याआधी घराण्याच्या परंपरेनुसार पूजेला योग्य अशी वेशभूषा करावी. यजमानाने सोवळे त्यावर कुर्ता अथवा झब्बा, पायजमा आणि यजमान पत्निने साडी किंवा सलवार कमीज दुपट्टा इ. वेशभूषा करावी.
- खाली दिलेल्या पद्धतीनुसार व चित्रांनुसार पुजेची तयारी करावी.

### ॥ चौरंगाची मांडणी ॥

- चौरंगा वर श्री गणेशाचे मुख पूर्व दिशेला (शक्य नसल्यास पश्चिमेलाही चालेल) येईल अश्या रितीने योग्य जागी भिंतीला टेकुन चौरग ठेवावा व त्यावर एक चांगले वस्त्र अंथरावे.
- सर्व पूजा साहित्य पूजेच्या जागी आणून वेगवेगळ्या तबकांमध्ये किंवा ताटल्यांमध्ये चौरंगाच्या उजव्या बाजूला नीट मांडून ठेवावे. एका वाटीत कपभर दूध घ्यावे, त्यात २ ते ३ चमचे दही, १ चमचा मध, १ ते २ चमचे तूप व १ चमचा साखर टाकून पंचामृत तयार करावे. पूजाविधिसाठी जितक्या व्यक्तिंना आमंत्रण दिले असेल त्याप्रमाणात सर्वांना पुरेल इतके पंचामृत तयार करावे.
- चौरंगाच्या मागच्या दोन कोपऱ्यात सुंदर ताजी फुले असलेल्या फुलदाण्या ठेवाव्यात. आवड असल्यास श्री गजाननासाठी सुंदर अशी आरास करावी. शक्य असल्यास मुलांना मार्गदर्शन करून त्यांच्याकडून आरास करून घ्यावी. मुलांच्या कल्पनाशक्तीला आणि उत्साहाला योग्य वाव आणि प्रोत्साहन द्यावे. आपणही त्यात उत्साहाने सहभागी व्हावे.
- चौरंगाच्या मध्यभागी विसर्जनासाठी आणलेली श्री गणेशमूर्ति ठेवावी. त्याच्या उजव्या बाजूला नेहमीच्या पूजेतली धातूची गणपतिची मूर्ति ठेवावी. त्याच्या उजव्या बाजूस असल्यास लक्ष्मीची वा देवीची मूर्ति किंवा नाणे ठेवावे.
- चौरंगावर पुढच्या बाजुला डाव्या कोपऱ्यात घंटा व उजव्या बाजुला तांदुळावर शंख ठेवावा. त्याचा निमुळता भाग आपल्याकडे करावा.

### ॥ चौरंगाच्या सभोवतालची मांडणी ॥

- चौरंगाच्या समोर आणि डाव्या व उजव्या बाजूला कार्पेट किंवा फ्लोअर खराब होऊ नये म्हणून अंदाजे २ फूट रूंदीची ॲल्युमिनियम फॉईल पसरवून ठेवावी.
- चौरंगाच्या उजव्या बाजुच्या पुढिल कोपऱ्यात ॲल्युमिनियम फॉईलवर एक तेलाची समई व तुपाचे निरांजन प्रज्वलित करावे. समई व निरांजन एखाद्या छोट्याश्या ताटलीत ठेवावे म्हणजे तेल अथवा तूप ओघळले तरी नुकसान होणार नाही. निरांजनाच्या शेजारी उदबत्ती लावावी.
- चौरंगाच्या पुढिल बाजूस ॲल्युमिनियम फॉईलवर ५ नारळ एका रांगेत मांडावेत. प्रत्येक नारळापुढे १ विड्याचे पान त्यावर १ डॉलरची नोट, १ क्वार्टरचे (२५ सेंट्सचे) नाणे त्यावर १ सुपारी, गूळखोबरे व पंचखाद्य (खारिक, काजू, बदाम, पिस्ते, बेदाणे इत्यादि ५ प्रकारचे सुक्या मेव्याचे पदार्थ) ठेवावेत.
- विड्याच्या पानांसमोर १ ताम्हण, १ पंचपात्र (पाणी पिण्याचे भांडे) त्यात १ पळी, १ कलश भरून पाणी ठेवावे.
- चौरंगाच्या डाव्याबाजूला सोयीस्कर अंतरावर पूजेचे वापरलेले ताम्हणातले पाणी काढून ठेवण्यासाठी १ मोठ्या आकाराचे भांडे ठेवावे. त्याच्याजवळच पाण्याने भरलेले पूजेच्या पाण्याचे भांडे अथवा मोठ्या आकाराची पाण्याने भरलेली बाटली ठेवावी.
- १ तबक किंवा ताट घेऊन त्यात कुंकु, अष्टगंध व चंदन यांच्या मिश्रणाचे पाणी टाकून गंध तयार करावे. गंधाच्या शेजारीच हळद व कुंकु करंड्यात किंवा नुसतेच ठेवावे. त्याच्या शेजारी गुलाल, बुक्का, शेंदूर, अत्तराची बाटली इ. ठेवावे.
- आरतीसाठी १ स्वतंत्र तबक, ताम्हण किंवा ताट ठेवावे. त्यात असल्यास आणखी १ तूपाचे निरांजन ठेवावे.
- चौरंगाच्या समोर यजमान व यजमान पत्नीसाठी बसण्यासाठी चांगले आसन ठेवावे. यजमानांच्या उजव्या बाजूला यजमान पत्नीने बसावे.
- चौरंगाच्या डाव्या बाजूला भींतीला टेकुन एक आसन गुरूजींसाठी ठेवावे. यजमान पूर्वेकडे तोंड करून बसल्यास गुरूजींचे तोंड पश्चिमेकडे असले पाहीजे व यजमान पश्चिमेकडे तोंड करून बसल्यास गुरूजींचे तोंड पूर्वेकडे असले पाहीजे.

- सामग्री यादीत दिल्याप्रमाणे पूजेचे सर्व साहित्य प्लॅस्टीकच्या पिशव्यांमधून काढून वेगवेगळ्या ४ ते ५ ताटल्यांत, ट्रेमध्ये किंवा डिस्पोझेबल प्लेट्समध्ये चौरंगाच्या उजव्या बाजूला निट मांडून ठेवावे. यादीप्रमाणे पुन्हा एकदा साहित्य निट तपासुन बघावे. (पूजेचे सामान हरवू नये व गुरूजी आल्यावर सामग्रीवरून आपआपसांत भांडू नये. ☺)

वरील सर्व तयारी गुरूजी येण्या आधीच करावी म्हणजे पूजा वेळेत सुरू होऊन वेळेत संपू शकेल व उपस्थितांना, यजमानांना व गुरूजींना वेळेत मोदक व प्रसाद मिळू शकेल. ☺




Wall
Panditji
Foil
East
North
Dais
South
West
Foil
Samagri
Samagri
Samagri
Samagri
Samagri
Aluminum Foil
Host
Wife of Host

|| मंगलमूर्ति मोरया ||